## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक २९.०१.२०१७<br>०३.०० |
| --- | --- | --- |

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :–औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावदारे आपणास सुचिम करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक २८.०१.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे चिकलठाणा:–** गुरन I ४५/१७ कलम २७९ ३३७ ३३८ ३०४(अ) भादवि सह कलम १३४/१७७ मोवाका नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे माजीद खॉ साहेद पठाण वय २८ वर्ष व्यवसाय व्यापार रा. शेंद्रा (क.) ता.जि.औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की यातील कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगात हयगयी व निष्काळजीपणे चालवुन रोडची परिस्थीती लक्षात न घेता फिर्यादीचे वडील वाहेदखॉ अहेमदखॉ पठाण रा. शेंद्रा ता.जि. औरंगाबाद यांना जोराची धडक देवुन किरकोळ व गंभीर जखमी करून त्यांचे मरणास कारणीभुत झाला व अपघाताची खबर न देता वाहन घेवुन पळुन गेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ देशमुख पोस्टे चिकलठाणा हे करीत आहे.

**०२) पोस्टे वैजापुर:–** गुरन I ४५/१७ कलम ३०४(अ) २७९ ३३७ ३३८ भादवि सह कलम १३४/१७७ मोवाका नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे संजिव प्रदीप मोरे वय ३७ वर्ष व्यवसाय मजुरी रा. भिलहाटी ता. वैजापुर यांनी फिर्याद दिली की यातील ट्रक क्रं. एमएच २० एटी ४८७६ चा चालक नामे दिलीप सातपुते रा. वैजापुर याने त्याचे ताब्यातील ट्रक क्रं. एमएच २० एटी ४८७६ हि भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन ट्रक पलटी करून यातील मयत नामे शामु सदु गोरे रा. भिलहाटी वैजापुर याचे मरणास व साक्षीदारयांना जखमी करण्यास कारणीभुत होवुन पोस्टेला

अपघाताची खबर न देता पळुन गेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. जाधव सपोनि पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

**०३) पोस्टे खुलताबादः—** गुरन I २६/१७ कलम ४२० ३४ भादवि सह कलम ६६(ड) माहीती तंत्रज्ञान कायदा नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे अमोल अशोक कारभार वय २४ वर्ष व्यवसाय शेती रा. ताजनापुर ता. खुलताबाद यांनी फिर्याद दिली की यातील १) मोबाईल कं. ९२१०३४९६१८ चा धारक नाव गाव माहीत नाही २) मोबाईल कं. ९२१०१६३२०८ चा धारक नाव गाव माहीत नाही ३) मोबाईल कं. ७०५३४९३०९४ चा धारक नाव गाव माहीत नाही ४) मोबाईल कं. ९२११७८१६३९ चा धारक नाव गाव माहीत नाही ५) मोबाईल कं. ७९६५२१००८१ चा धारक नाव गाव माहीत नाही ६) मोबाईल कं. ९०५४७३०८६६ चा धारक नाव गाव माहीत नाही ७) मोबाईल कं. ८७३४००६३९५ चा धारक नाव गाव माहीत नाही ८) मोबाईल कं. ७०४८७७०३७६ चा धारक नाव गाव माहीत नाही यांनी फिर्यादीस पर्सनल लोन देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यासाठी सर्व्हिस म्हणुन ७८६९०/—रू. एक्सीस बॅकेच्या दिलेल्या खात्यावर भरण्यास सांगितले वरून सदर रकम फिर्यादीने भरल्यानंतर परत मोबाईल कं. ०५ ते ०८ धारकांनी फिर्यादीस शेअर मार्केट मध्ये रक्कम ४५ दिवसात दुप्पट करण्याचे आमिष दाखवुन परत फिर्यादीचा विश्वास संपादन करून आरोपींनी दिलेल्या बॅक ऑफ बडोदा चे खात्यावर १ लाख ६६ हजार रूपये भरण्यास सांगितले ते फिर्यादीने भरल्यानंतर वरील सर्व आरोपी मोबाईल धारकांनी फोन बंद करून कोणतेही पर्सनल लोन अथवा शेअर मार्केट मध्ये पैसे दुप्पट करून दिले नाही व फिर्यादीचा विश्वास घात करून २ लाख ४४ हजार ६९०/—रू.ची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. भुजंग पोनि पोस्टे खुलताबाद हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे सिल्लोडग्रामिणः—** आ.मृ. नंबर ०४/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार एस.बी. घुले सफौ घाटी चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे संगिता रमेश चाते वय ३५ वर्ष रा. वडोदचाथा ता. सिल्लोड हिने राहते घरी काहीतरी विषारी औषध सेवन केल्याने तीचे वर घाटी दवाखाना औरंगाबाद येथे उपचार चालु असताना मरण पावली वगैरे

एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/९९६ नागरगोजे पोस्टे सिल्लोडग्रामिण हे करीत आहे.

**०२) पोस्टे पैठणः–** आ.मृ. नंबर ०३/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार संजय बाबु भिल वय ५० वर्ष व्यवसाय संतपिठ चौकीदार पैठण रा. पैठण यांनी खबर दिली की यातील मयत अनोळखी पुरूष नाव गाव माहीत नाही वय अंदाजे ५५ वर्ष याने अज्ञात कारणासाठी स्वत: सुती दोराचे सहायाने लिंबाचे झाडाला गळफास घेवुन मरण पावला आहे वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. एकशिंगे पोउपनि पोस्टे पैठण हे करीत आहे.

**०३) पोस्टे कन्नडशहरः–** आ.मृ. नंबर ०५/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार वैद्यकीय अधिकारी ग्रामिण रूग्णालय कन्नड यांनी खबर दिली की यातील मयत नामे पल्लवी लक्ष्मण गुंजाळ वय १६ वर्ष रा. रेल ता. कन्नड हिने राहते घरी गळफास घेतल्याने तीस ग्रामिण रूग्णालय कन्नड येथे उपचार कामी दाखल केले असता मयत घोषीत केले वगैर एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. पवार पोउपनि पोस्टे कन्नड हे करीत आहे.

**दारू बंदी कार्यवाही :–**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला १४ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे १४ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ८३२५/–रू. किं. १८० मिलीच्या १२५ देशी दारूच्या बाटल्या व ४५ ली. गावठी हातभट्टीची दारू चा माल जप्त करण्यात आला आहे.

**मुंबई जुगार कायदयाप्रमाणे केलेली कार्यवाहीः–**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०२ गुन्हे मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०९ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ४२५०/–रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री पोउपनि कुलकर्णी नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण